


दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | सोमवार २८ ऑक्टोबर २०२४ | अंक ३२२ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु



प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

९४०३६ ४१४८२

राहुल मारोतीराव वाईकर


# दादांचे मुक्के घ्यायला पाहिजे सगळ्यांनी, लय चांगले काम केलंय त्यांनी; चंद्रकांत पाटील यांना मनोज जरांगेंचा टोला

## कसला हरियाणा पॅटर्न?

करणार आहेत ते पॅटर्न, छान काम करणार आहेत, सगळे पाडून घेणार आहेत, पुरे. देवेंद्र फडणीस यांचे रक्त कळत नाही कुणाचं आहे.सकाळी सकाळी म्हणतात मी हिंदू आहे. दुपारी म्हणतात मी OBC चा DNA, तिसऱ्या प्रहरी म्हणतात पुरोगामी रक्त आहे. भाजपानं, आरएसएसनं संपवलं सगळं, असे ते म्हणाले.

विधानसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत मराठा फॅक्टर किती प्रभावी ठरतो हे समोर येईलच. पण सध्या मनोज जरांगे पाटील यांनी भाजपविरोधात, विशेषतः उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याविरोधात मोर्चा उघडला आहे. त्यांनी भाजपचे ज्येष्ठ नेते चंद्रकांत दादा पाटील यांच्यावर सुद्धा टीका केली आहे. निवडणुकीच्या तोंडावर आता अनेक मुद्यांवर एकमेकांवर थेट हल्ले होते आहे. आमचं काय चुकलं





ते मनोजदादांनी एकदा सांगावं, असं वक्तव्य चंद्रकांत दादांनी केलं होते. त्यानंतर मनोज जरांगे पाटील यांनी त्यांच्यावर पण हल्लाबोल केला.

दादांचे मुक्के घ्यायला पाहिजे सगळ्यांनी... चंद्रकांत दादा पाटलांचे काही चुकलं नाही. त्यांनी शेतकऱ्यांना कर्जमुक्ती दिली. शेतकऱ्यांच्या मालाला भाव दिला. शेतकऱ्याला आत्महत्या करायला लावल्या, मराठ्यांना आत्महत्या करायला लावल्या, दहा वर्षांपूर्वीच त्यांनी धनगर समाजाला आरक्षण दिले. म्हाडाचे घरकुल गरीबांना द्यायचे ते त्यांनीच घेतले. खूप चांगले काम केले आहेत त्यांनी. मराठ्यांना आरक्षण न देता ओबीसींना दिलं हे चांगलं काम केलं. परत मराठ्यांना SCBC आरक्षण देऊन EWS मध्ये घातलं छान काम आहे. दादांचे मुक्के घ्यायला पाहिजे सगळ्यांनी, लय चांगले काम केले आहे त्यांनी. मराठ्याच्या पोरावर केसेस केल्यात, महिलांना बंदुकीने ठोकलं, गोळ्या घातल्या काय चांगलं काम केलं. देव माणूस आहे दादा, शेंदूर लावायला पाहिजे कोणी फक्त दादाला शेंडी ठेवली

## फडणवीस भाजप संपवणार

**देवेंद्र फडणवीस घरात बसून गणित मांडतात. म्हणून वाटतं हा माणूस खूप छान आहे असं थोडी ढेरी मोठी आहे. नंतर भाजपच्या लोकांना वाटतं हे काय लफडं झालं म्हणून सांगतो हे आरएसएस संपवायला लागला हे भाजप संपवायला लागला. फक्त देवेंद्र फडणवीस यांच्यामुळे या राज्यातील भाजप संपेल दुसरे कोणामुळे नाही, असे जरांगे म्हणाले. देवेंद्र फडणवीस सागर बंगल्यावर बसून जमत नसतं. आम्ही आरक्षण मागीतलं. आम्हाला दिलं नाही, आमच्या डोळ्यात देखत ओबीसींना दिलं. फडणवीस हे मस्तीत जगणारा माणूस आहे, त्यांनी मराठ्याला खुन्नस दिली आता मराठा तुम्हाला जुमानत, मानत नाहीत, असा इशारा त्यांनी दिला.**

# ठरले! आज संदीपभैय्या उमेदवारी अर्ज भरणार

बीड दि.२७ (प्रतिनिधी):- बीड विधानसभा मतदारसंघासाठी महाविकास आघाडीचे अधिकृ त उमेदवार म्हणून आ.संदीप क्षीरसारांच्या नावाची अधिकृ त घोषणा होताच दसर् या दिवशी आ.संदीप क्षीरसागर यांनी आपल्या कार्यकर्त्यांसोबत बैठक घेऊन संवाद साधला. परंतु या बैठकीचे रूपांतर सभेतच झाले. यावेळी, सोमवारी (दि.२८) रोजी साध्या पद्धतीने अर्ज भरण्याचे ठरले आहे. यासोबतच बैठक संपली की आ.क्षीरसागर यांनी अं तरवाली सराटी येथे जाऊन क्रांतीकारी नेतृत्व मनोज दादा जरांगे पाटील यांची भेट घेतली. शनिवारी (दि.२६) रोजी बीड विधानसभा मतदारसंघासाठी महाविकास आघाडीचे अधिकृ त उमेदवार म्हणून विद्यमान आमदार तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष संदीप क्षीरसागर यांच्या नावाची घोषणा पक्षाच्या वतीने करण्यात आली.

# आष्टी येथे होणाऱ्या स्नेह मेळाव्यास बहुसंख्येने उपस्थित राहा

**प्रस्थापित विरुद्ध विस्थापितङ्ग च्या लढाईत शिवाजी काका राऊत यांच्या पाठीशी उभे रहा - सुनील काळे**

पाटोदा प्रतिनिधी : आष्टी मतदारसंघांमध्ये उमेदवारीच्या प्रश्नावर चांगली रस्सीखेच दिसून येत आहे. उमेदवारीचा तिढा अजूनही सुटलेला नाही. गेल्या निवडणुकी मध्ये बाळासाहेब आजबे यांना निवडून आणण्यासाठी शिवाजी राऊत यांनी भक्कम पाठबळ लाऊन त्यांना विजयाचा गुळाला लावला.मात्र ह्या वेळेस शिवाजी राऊत स्वत निवडणूक लढविणार आसल्याने प्रस्थापितांच्या मनात धडकी भरली आहे. राऊत यांच्या कार्यकर्त्यांने एकच विचारधारा मनात धरून,त्यांना निवडून आणण्याचा निर्धार केला आहे.उद्या आष्टी येथे होणाऱ्या स्नेह मेळाव्याच्या



रूपातून शिवाजी राऊत हे प्रस्थापितांसाठी डोखे दुःखी ठरणार आहेत.मतदार संघात दांडगा जन संपर्क आसल्याने,प्रत्येक तालुक्यात सकल ओबीसी समाजाची दिशा व दश्या संबंधी बैठका घेतल्याने जनतेमध्ये कामाचा माणूस आसल्याचा विश्वास बसून विजयापासून कोणीही रोखू शकत नाही आसा विश्वास जनतेमध्ये दिसून येत आहे

उद्याच्या होणाऱ्या स्नेह मेळाव्याच्या माध्मातून प्रस्थापित विरुद्ध विस्थापित अश्या लढाईत आष्टी पाटोदा शिरूर तालुक्यातून ज्यास्तित ज्यात कार्यकर्त्यांनी, युवकांनी, उपस्थित राहण्याचे आव्हान सुनील काळे यांनी केले आहे.

# कौशल्याबाई हंबर्डे यांचे अल्पशा आजाराणे निधन

दैनिक लोकआरंभ//

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : लोहा तालुक्यातील वाका येथील जेष्ठ महिला नागरिक कौशल्याबाई बालाजी पाटील हंबर्डे (वय-वर्षे ७२) यांचे दि.२७-ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७ वाजता निधन झाले असून त्यांच्या पार्थिवावर दि.२८-



ऑक्टोबर रोजी दुपारी १ वाजता वाका येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे,त्यांच्या पश्चात तीन मुली एक मुलगा सून नातवंडे असा मोठा परिवार आहे.चक्रधर बालाजी पाटील हंबर्डे स्वस्त धान्य दुकानदार वाका यांच्या त्या मातोश्री होत.

# खा. प्रीतम ताई मुंडे यांना माजलगाव मतदार संघाची उमेदवारी दिली तर माघार अन्यथा निवडणूक लढवणार माधव तात्या निर्मळ

आज मुंबई येथे ना.उपमुख्यमंत्री अजित दादा पवार,प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, कृषिमंत्री धनंजय मुंडे साहेब जिल्हा परिषद सदस्य लालासाहेब तिडके.सरपंच. शिवाजीराव काळे.यांच्यासोबत बैठक झाली. या बैठकीमध्ये माधव निर्मळ यांना अपक्ष निवडणूक लढवू नका.आपला भविष्यामध्ये चांगला सन्मान करू असे सांगण्यात आले. मात्र यावर माधव निर्मळ यांनी अपक्ष लढणार असून आपली भूमिका ठाम आहे असे सांगितले. माजलगाव मतदारसंघांमध्ये मुंडे कुटुंबीयावर प्रेम करणारा खूप मोठा वर्ग आहे. लोकनेत्या पंकजाताई मुंडे लोकसभेला अल्पशा मताने पराभूत झाल्या



त्यामूळे आजही मतदारसंघातील लोकांच्या मनामध्ये सल आहे. ही सल भरून काढायची असेल तर खासदार प्रीतम ताई मुंडे यांना माजलगाव मतदारसंघांमध्ये उमेदवारी द्या कुठल्याही अटी शर्ती शिवाय उमेदवारी अर्ज मागे घेतो असे माधव तात्या निर्मळ यांनी सांगितले.

# ओबीसीचा विकसनशील चेहरा सरपंच गजानन खामकर यांचा अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल

तालुक्यातील धडाडीचे ओ.बी.सी. नेते म्हणून ओळख निर्माण केलेले व तालुक्यामध्ये सर्व परिचित असलेले विकसनशील चेहरा म्हणून सर्वश्रुत असलेले मा. सरपंच तथा सांडस चिंचोली नागडगाव ग्रुप सोसायटी व्हाईस चेअरमन, समाज सुधारक पुरस्कार प्राप्त नागडगावचे गजानन खामकर यांचा अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल. माजलगाव विधानसभा मतदार संघा मध्ये उमेदवारी अर्ज दाखल करण्याची लगबग चालू असून तालुक्यातील सर्व परिचित असलेले सरपंच तथा सांडस चिंचोली नागडगाव ग्रुप गसोसायटी व्हाईस चेअरमन समाज सुधारक पुरस्कार प्राप्त ओबीसी चे नेते गजानन खामकर यांची सध्या जोरदार चर्चा चालू असून ओ.बी.सी.चे खंबीर नेतृत्व मा. सरपंच गजानन खामकर असल्याचे सर्वसामान्य नागरिकांतून बोलले जात आहे. प्रस्थापितासाठीच नव्हे तर लोकशाही मध्ये संविधानाने दिलेल्या अधिकारानुसार सर्वांना समान हक्क असुन सर्वसामान्यांना देखील निवडणुकीस उभे राहण्याचा



अधिकार आहे. याचे भान प्रस्थापितांना राहिले नाही. यामुळेच राजकीय प्रस्थापितांची मक्तेदारी मोडीत काढावी लागेल गेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये संधी हुकली ती आता हुकु द्यावयाची नाही. लोकशाहीमध्ये प्रत्येक नागरिकास निवडणूक लढवण्याची संधी असते. परंतु ही संधी मिळवण्यासाठी निवडणुकीमध्ये सामोरे जावे लागते. माजलगाव मतदार संघाची निवडणूक लढवण्याची गजानन खामकर यांनी पूर्णतः तयारी केली असून. त्यांनी केलेल्या राजकीय जीवनातील विकासाच्या व कामाच्या पावतीच्या जोरावर ते जनतेसमोर निवडणुकीस सामोरे जाण्यास तयार झाले आहेत. ते राजकीय दिशा ओळखून दूर दृष्टीने निर्णय घेऊन सकारात्मक पाऊल उचलत आगामी निवडणुकीमध्ये सामोरे जाणार आहेत. त्यांच्या अंगी असणारा निष्णातपणा त्यांच्या व्यक्तिमत्वात आहे. लोकांना गृहीत धरून एकाधिकारशाहीचे राजकारण मोडीत काढून सर्वसामान्य लोकांच्या मनातले प्रश्न ओळखुन लोकहिताचे निर्णय घेत सर्वसामान्य जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी व जनतेची निस्वार्थ भावनेतून सेवा करण्यासाठी सेवक म्हणून जनतेने संधी दिल्यास या संधीचे सोने केल्याशिवाय स्वस्त बसणार नाही. जनसेवा हीच खरी ईश्वर सेवा समजून थेट आमदार आपल्या दारी हीच संकल्पना राबवून मतदारसंघातील जनता दरबार घेऊन त्यांच्या अडीअडचणी सोडवण्याचा सदैव प्रयत्न करणार. या निवडणुकीमध्ये यश अपयशाची परवा न करता लोकशाही मार्गाने संघर्ष चालूच ठेवून समाजकारण आणि राजकारणाच्या माध्यमातून केलेली सेवा वेळोवेळी येथील जनतेशी साधलेला संवाद व संपर्क यामुळे निर्माण झालेली लोकशक्ती प्रचलित प्रस्थापितांना गारद करण्यासाठी सज्ज असून. राजकीय मक्तेदारी व दहशतीखाली दबलेला काही मतदार वर्ग खुल्या मनाने बोलत नसला तरी निवडणुकीच्या रणधूमाळीत मतदार राजा भयमुक्त होऊन गजानन खामकर यांना बिनधास्त मतदान करेल. आज घडीला राजकीय परिस्थिती लक्षात घेता गजानन खामकर यांच्या रूपाने ओबीसीचा तरुण विकसनशील चेहरा असलेल्या गजानन खामकर यांना माजलगावकरांची साथ निश्चित लाभू शकते.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
सोमवार २८ ऑक्टोबर २०२४
https://lokaarambh.com



# कला- लोकांसाठी अधिक सुलभ बनवण्याची एक उत्कृष्ट संधी

मागील वर्षी ॲनिमेशन क्षेत्रात तरुणांना अनेक संधी; तज्ज्ञांचे तरुणांना मार्गदर्शन मिळाले. असिफा इंडिया संस्थेतर्फे पुण्यात आंतरराष्ट्रीय ॲनिमेशन दिन साजरा झाला. बदलत्या काळानुसार तरुणांसमोरील आव्हाने आता बदलत आहे, त्यामुळे तरुणांनी वर्षानुवर्षे परंपरागत इंजिनिअरिंग आणि मेडिकल यांसारख्या पारंपारिक क्षेत्रांकडेच करिअर म्हणून न पाहता ॲनिमेशन, गेमिंग, विज्युअल इफेक्ट्स फाईन आर्ट्स यांच्यासारख्या नवीन वाटाही शोधायला हव्यात. भविष्यकाळात ॲनिमेशन क्षेत्रामध्ये तरुणांना अनेक संधी उपलब्ध असून नवीन शैक्षणिक धोरणानुसार त्यामुळे या क्षेत्रात लाखो रोजगार निर्मिती होणार आहे, अशी माहिती असिफा इंडिया संस्थेतर्फे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात ॲनिमेशन क्षेत्रातील तज्ज्ञांनी दिली. असिफा संस्थेतर्फे आंतरराष्ट्रीय ॲनिमेशन दिनानिमित्त पुण्यामध्ये आयोजित करण्यात आलेल्या परिषदेमध्ये भारताच्या विविध भागातून आलेल्या तज्ज्ञांनी ॲनिमेशन क्षेत्रातील तरुणांसाठी असणारी संधी या विषयावर मार्गदर्शन केले. श्री कृष्णकुमार आनंदी- गोविंदा निकोडे गुरूजींचा मार्गदर्शक लेख जरूर वाचा.... संपादक.

२८ ऑक्टोबर, आंतरराष्ट्रीय ॲनिमेशन दिन- आईएडी हा ॲनिमेशन कला साजरे करण्यासाठी आसिफाद्वारे सन २००२मध्ये घोषित केलेला एक आंतरराष्ट्रीय दिवस जगभर साजरा होतो. हा दिवस सन १८९२मध्ये पॅरिस येथील पहिल्या सार्वजनिक कामगिरीचे स्मरण करतो. त्यावेळी लुमिरे बंधूंच्या सिनेमॅटोग्राफने रेनॉडच्या आविष्काराला मागे टाकले आणि एमिलला दिवाळखोरीकडे नेले. तथापि, ॲनिमेशनच्या त्याच्या सार्वजनिक कामगिरीने ऑप्टिकल मनोरंजनाच्या इतिहासात प्रवेश केला आहे, कारण लवकरच कॅमेरा-निर्मित चित्रपटांची पूर्वकल्पना आहे. अलिकडच्या वर्षांत हा कार्यक्रम ५० हून अधिक देशांमध्ये हजारहून अधिक कार्यक्रमांसह, प्रत्येक खंडात, संपूर्ण जगभरात साजरा केला गेला आहे. आईएडीची सुरुवात आसिफा, इंटरनॅशनल ॲनिमेटेड फिल्म असोसिएशन, युनेस्कोचे सदस्य आहे. आंतरराष्ट्रीय ॲनिमेशन दिनादरम्यान सांस्कृतिक संस्थांना ॲनिमेशन चित्रपट दाखवून, कार्यशाळा आयोजित करून, कलाकृती आणि चित्रांचे प्रदर्शन, तांत्रिक प्रात्यक्षिके प्रदान करून आणि ॲनिमेशन कलेला प्रोत्साहन देण्यासाठी इतर कार्यक्रम आयोजित करून सहभागी होण्यासाठी आमंत्रित केले जाते. असा उत्सव म्हणजे ॲनिमेटेड चित्रपट प्रसिद्धीच्या झोतात आणण्याची, ही कला लोकांसाठी अधिक सुलभ बनवण्याची एक उत्कृष्ट संधी आहे. आसिफा प्रत्येक वर्षी कार्यक्रमाची घोषणा करणारे मूळ आर्ट पोस्टर तयार करण्यासाठी कलाकाराला कमिशन देखील देते. त्यानंतर इव्हेंटचे जगभरातील दृश्य हमी देण्यासाठी प्रत्येक देशासाठी ते रुपांतरित केले जाते. मागील आवृत्त्यांमध्ये इओरी टेचेरेन्कोव्ह, पॉल ड्रायसेन, अबी फीजो, एरिक लेड्युन, नॉरेडिन झारिन्केल्क, मिशेल ओसेलॉट, नीना पाले, राऊल सर्व्हायस, इहाब शेकर आणि जियानलुइगी टोकाफोंडो यांसारख्या ॲनिमेटर्सच्या कार्याचा समावेश होता.

पूर्ण-लांबीचे ॲनिमेशन चित्रपट, ऐतिहासिक वैशिष्ट्ये, ॲनिमेटेड शॉर्ट्स आणि विद्यार्थी चित्रपट, ॲनिमेशन आर्टचे सर्व प्रकार कार्यशाळेत दाखवले जातात. हे चित्रपट तंत्रांची विलक्षण श्रेणी प्रदर्शित करतात- रेखाचित्र, चित्रकला, कठपुतळी आणि वस्तू ॲनिमेट करणे, माती, वाळू, कागद आणि संगणक वापरून. अनेक ॲनिमेटेड चित्रपट गैर-मौखिक असल्यामुळे, सांस्कृतिक अभिव्यक्ती आणि संप्रेषणासाठी ही एक समृद्ध संधी आहे. फिकी ॲनिमेशन रीजवल इफेक्ट्स गेमिंगचे संचालक आशिष कुलकर्णी, फ्रेमबॉक्स ॲनिमेशनच्या उपाध्यक्षा विनिता बचानी, आसिफा इंडियाचे प्रमुख संजय खेमसरा, गॉड स्पीड गेम्स पुणे से संचालक गृहीम मुखर्जी फिल्म सीजीआय पुणेचे प्रमुख अमित भारद्वाज, इंडस्ट्रियल गेमिंग अँड मॅजिक मुंबईचे मनन देसाई, एम टू ॲनिमेशन मुंबईचे सीनियर डेव्हलपमेंट मॅनेजर सुभाजीत सरकार या तज्ज्ञांनी या परिषदेमध्ये तरुणांना मार्गदर्शन केले. फ्रेमबॉक्स संस्थेच्या उपाध्यक्षा विनिता बचानी म्हणाल्या गेल्या काही वर्षापर्यंत ॲनिमेशन क्षेत्र हे महिलांसाठी विशेषता तरुण मुलींसाठी नाही असा गैरसमज निर्माण झाला होता. या क्षेत्रामध्ये काम करण्याची असणारी अनिश्चितता, वेळेचे बंधन नसणे त्यामुळे तरुणी या क्षेत्रामध्ये काम करण्यासाठी इच्छुक नव्हत्या. परंतु आता मात्र अनेक ॲनिमेशन संस्था, स्टुडिओ आणि जाहिरात कंपन्या महिलांना त्यांच्या वेळेच्या सोयीनुसार काम देण्यास तयार आहे, त्यामुळे गेल्या काही वर्षांपासून महिलांचा या क्षेत्रामध्ये येण्याचे प्रमाण वाढले आहे. पुण्यासह देशाच्या विविध भागातील ॲनिमेशन इन्स्टिट्यूट मध्ये महिलांचे प्रवेश घेण्याचे प्रमाण वाढले देखील आहे. देशाच्या अनेक विद्यापीठांमध्ये ॲनिमेशन क्षेत्रातील अभ्यासक्रमसाठी महिलांना प्राधान्य देण्यात येत आहे. ॲनिमेशन गेमिंग व्हिज्वल इफेक्ट्स, फाईन आर्ट्स यांसारख्या वेगळ्या प्रकारच्या क्षेत्रांमध्ये महिलांचे वाढणारे प्रमाण हे निश्चितच त्यांच्यासाठी आणि देशाच्या शैक्षणिक धोरणांसाठी तसेच महिलांचे ॲनिमेशन क्षेत्रातील प्रमाण वाढविण्यासाठी चांगली बाब आहे. आशिष कुलकर्णी म्हणाले तरुणांसमोरील आव्हाने लक्षात घेता केंद्र सरकारने नुकतेच नवीन शैक्षणिक धोरण अमलात आणले आहे. या शैक्षणिक धोरणानुसार तरुणांना पारंपारिक विषयांव्यतिरिक्त त्यांच्या आवडीच्या विषयांमध्ये करिअर करण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येणार आहे. याचाच एक भाग म्हणून शाळांमध्ये इयत्ता सहावी पासून विद्यार्थ्यांना ॲनिमेशन, गेमिंग, फाईन आर्ट्स यांसारख्या नवीन विषयांची ही ओळख करून देण्यात येणार आहे. त्यामुळे त्यांना या विषयांची शालेय स्तरावरच माहिती होईल तसेच या क्षेत्रातील त्यांना गोडी लागण्यास मदत होईल. लहानपणापासूनच वेगळ्या क्षेत्रातील माहिती असल्यास त्यांना कॉलेज नंतर करिअरसाठी वेगळ्या संधीही उपलब्ध होऊ शकतील. त्यामुळेच नवीन शैक्षणिक धोरणामध्ये या विषयावर अधिक लक्ष देण्यात आले आहे. संजय खेमसरा म्हणाले, "असिफा या संस्थेच्या माध्यमातून तरुणांना भविष्यकाळातील संधीचा कसा लाभ घेता येऊ शकेल या संदर्भात संस्थेकडून संपूर्ण आशियामध्ये परिषद आयोजित करण्यात येते. याचाच एक भाग म्हणून पुण्यामध्ये आंतरराष्ट्रीय ॲनिमेशन दिनानिमित्त परिषद आयोजित करण्यात आली. या परिषदेमध्ये ॲनिमेशन क्षेत्रातील तज्ञ विद्यार्थ्यांना भविष्यातील बदलते तंत्रज्ञान आणि संधी या संदर्भात मार्गदर्शन केले. या मार्गदर्शनाचा निश्चितच तरुणांना फायदा होणार असून त्यामुळे तरुणांना कॉलेज नंतर वेगळ्या संधी उपलब्ध होणार आहेत. असिफा तर्फे अनरियल या सॉफ्टवेअर कंपनीच्या सहकार्याने दरवर्षी ५० ॲनिमेशन क्षेत्रातील तंत्रज्ञांना प्रत्येकी पाच हजार डॉलर प्रमाणे शिष्यवृत्ती देण्यात येते. या शिष्यवृत्तीच्या माध्यमातून आधुनिक तंत्रज्ञान आणि त्याची माहिती दिली जाते.

# वंचित बहुजन आघाडी तुळजापूर मतदारसंघांमध्ये उमेदवार स्नेहा सोनकाटे आपल्या वाढदिवसाच्या दिवशी भरणार उमेदवारी अर्ज,

## ताकविकी गाव ते डॉ, बाबासाहेब आंबेडकर चौक तुळजापूर बाईक रॅली

बीड प्रतिनिधी. अंकुश गवळी

ओबीसी आरक्षणाच्या आणि लोकशाहीच्या सशक्तीकरण्यासाठी वंचित बहुजन आघाडीचे अधिकृत उमेदवार स्नेहा सोनकाटे यांनी मैदानात उतरण्याचा निर्णय घेतला आहे, 28 ऑक्टोबरला त्या उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत ,लहानपणापासूनच अहिल्यादेवी होळकर यांच्या पुरोगामी विचारावर आधारित



जीवन प्रेरणा घेणाऱ्या स्नेहा सोनकाटे यांनी आज त्यांच्या जन्मदिनी उमेदवारी अर्ज भरण्याचा संकल्प केला आहे, स्नेहा सोनकाटे यांनी या निवडणुकीत सत्ता करण्यासाठी नाही तर ओबीसी समुदायाच्या अस्तित्वासाठी आणि हक्कासाठी संघर्ष करण्यासाठी उभ्या आहेत या निवडणुकीत सरकारच्या गोरगरिबावर होणाऱ्या अन्यायाला रोखण्यासाठी लोकशाहीची ताकद दाखवण्यासाठी आणि ओबीसी आरक्षणाचे रक्षण करण्यासाठी त्या संघर्ष करणार आहेत ,या निवडणुकीची भूमिका आणि उद्दिष्टे स्पष्ट करताना स्नेहा ताई सोनकाटे आपला ठाम दृष्टिकोन मांडतील उमेदवारी अर्ज भरल्यानंतर आयोजित आयोजित सभेत या निवडणुकीची भूमिका स्पष्ट करतील आणि त्यांचा लढा काय आहे जनतेसमोर मांडतील

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बाहेगव्हाण च्या विद्यार्थ्यांनी बनवले आकर्षक आकाशकंदील



.....बीड प्रतिनिधी वडवणी पासून जवळच असलेल्या बाहेगव्हाण जि. प. प्रा शाळेतील मुलांनी दिपावली निमित्त स्वतः आकर्षक असे आकाशकंदील व ग्रिटींग कार्ड तयार केले आहेत. आनंददायी शनिवार विनादप्तराची शाळा उपक्रमातंर्गत शाळेचे मुख्याध्यापक तथा केंद्रप्रमुख श्री सुरेशरावजी करांडे यांच्या सुयोग्य नियोजनाने शाळेतील उपक्रमशील शिक्षिका श्रीमती थिटे मॅडम, श्रीमती शेंडगे मॅडम, श्रीमती बडदे मॅडम, व श्रीमती सौदरमल मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली इयत्ता पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी दिवाळी आकाशकंदील बनवले. दर्शन महाडीक, आकांक्षा मस्के, मैथिली डांबे, भक्ती मुळे, ऋतुजा जाधव, स्वेता मस्के, रणवीर जाधव, वैष्णव मस्के, अजिंक्य मस्के, दिशा जाधव, स्नेहल शेळके, प्रिती, सृष्टी कसबे, स्वराज निपटे, पृथ्वीराज मस्के, शेख सलीम, सई जाधव, वेदिका मस्के, स्वरा मस्के, श्रेयस मस्के, वेदांत मस्के, अर्णव, रिया कसबे यांनी वेगवेगळ्या आकारातील व वेगवेगळ्या रंगांनी बनवलेले हे आकाशकंदील सर्वांचेच लक्ष वेधून घेत आहेत.या बरोबरच काही विद्यार्थ्यांनी रंगीबेरंगी दिवाळी भेट कार्ड व पणत्या पेटींग केल्या आहेत. या उपक्रमात सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना जिल्हा आदर्श पुरस्कार प्राप्त शिक्षक हरिदास सोळंके सर, ज्ञानोबा शेळके सर, ट्रेनी शिक्षक अनंत मस्के सर यांनी सहकार्य केले. या उपक्रमात सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे वडवणी तालुक्याचे कर्तव्यदक्ष शिस्तप्रिय गटशिक्षणाधिकारी श्री बाबासाहेब उजगरे साहेब, शालेय व्यवस्थापन समितीचे सर्व पदाधिकारी, पालक, ग्रामस्थ, शिक्षण प्रेमी नागरिक यांनी अभिनंदन करून कौतुक केले. सर्वांना जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बाहेगव्हाण यांच्या तर्फे दिपोत्सवाच्या तेजोमय शुभेच्छा.

# हजारो कार्यकर्त्यांसमोर महेंद्रशेठ घरत यांनी दिला जिल्हाध्यक्ष पदाचा राजीनामा






उरण दि २७(विठ्ठल ममताबादे)२० नोव्हेंबर २०२४ रोजी महाराष्ट्रात होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत रायगड जिल्ह्यातील सात विधानसभेपैकी महाविकास आघाडीतर्फे काँग्रेस पक्षाला एकही उमेदवार न दिल्यामुळे रायगड जिल्ह्यामधील काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते व पदाधिकारी नाराज झाले आहेत. सर्व काँग्रेस कार्यकर्त्यांनी रायगड जिल्हा काँग्रेस अध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांना भेटून आपली भूमिका स्पष्ट करण्यासाठी आग्रह केला. रविवार दिनांक २७ ऑक्टोबर २०२४ रोजी हजारो कार्यकर्ते महेंद्रशेठ घरत यांना भेटण्यासाठी शेलघर येथे आले असता उपस्थित हजारो कार्यकर्त्यासोबत महेंद्रशेठ घरत यांनी संवाद साधला व आपली भूमिका स्पष्ट केली. यावेळी आपली भूमिका स्पष्ट करत असताना महेंद्रशेठ घरत म्हणाले की खरेतर लोकसभेची निवडणूक मावळ लोकसभा मतदारसंघ हा काँग्रेस पक्षाला पोषक होता परंतु उद्धव ठाकरे सेनेने आपला उमेदवार उभा केला व कोकणातील एकही सीट काँग्रेस पक्षाला मिळाली नाही. पुढील विधानसभेत काँग्रेस पक्षाला न्याय मिळेल असा आशावाद होता परंतु याही विधानसभेत रायगड जिल्ह्यात एकही विधानसभा मतदारसंघ काँग्रेस पक्षाला न सुटल्याने कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड असंतोष पसरला आहे. काँग्रेस कार्यकर्ते आम्ही कोणत्याही पक्षाचे ओझे उचलणार नाही असे म्हणणे होते. जोपर्यंत महाराष्ट्र प्रदेशचे नेते आदेश देत नाही तोपर्यंत आपण कोणत्याही पक्षाचे काम करायचे नाही असे ते म्हणाले. तसेच बॅरिस्टर ए.आर.अंतुले साहेबांच्या रायगड जिल्ह्यात काँग्रेस पक्षाला एकही विधानसभा मतदारसंघ न देता भोपळा मिळाला त्यामुळे महेंद्रशेठ घरत यांनी रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीचे प्रदेश चिटणीस तथा रायगड सहप्रभारी श्री. श्रीरंग बरगे यांच्यासमोर रायगड जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्ष पदाचा राजीनामा सादर केला.जनतेच्या संवाद सभेसाठी रायगड जिल्ह्यातून हजारोंच्या संख्येने काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. उरण मतदार संघात काँग्रेस पक्षाच्या मदतीशिवाय कोणताही उमेदवार निवडून येऊ शकत नाही ही काळ्या दगडावरची रेष असल्याचे काँग्रेस कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे उरण विधानसभेत काँग्रेस पक्ष किंगमेकर असेल.

# वीर वाजेकर महाविद्यालयाची मतदार जागृती अभियान रॅली संपन्न.

**उरण | प्रतिनिधी**

उरण दि २७(विठ्ठल ममताबादे )२६ ऑक्टोबर २०२४ रोजी वीर वाजेकर फुंडे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना,सांस्कृतिक विभाग,विद्यार्थी परिषद व डी. एल.एल.ई. विभागाच्या वतीने,जसखार, करळ व सोनारी गावातून रॅली काढण्यात आली. उरण तहसील कार्यालय व निवडणूक विभागाच्या तसेच



मुंबई विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या सूचनेनुसार सदर रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.आमोद ठक्कर, मतदार साक्षरता अभियानाचे प्रमुख डॉ.संदीप घोडके,राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमुख प्रा.राम गोसावी,सांस्कृतिक विभागाच्या डॉ.सुजाता पाटील,प्रा. भूषण ठाकूर,प्रा.गजानन चव्हाण तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकानी सहभाग नोंदविला. रॅली दरम्यान विद्यार्थ्यांनी मतदार जागृती विषयक घोषणा दिल्या.विद्यार्थ्यांना प्रवासासाठी माजी विद्यार्थी संघाने बसची व्यवस्था केली.तसेच सर्व विद्यार्थ्यांना शीत पेय व नाश्ताची व्यवस्था सुद्धा माजी विद्यार्थ्यांनी केली.मतदार जागृती अभियानामध्ये पथनाट्य,घोषणा देण्यात आल्या. सदर रॅलीस महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष तसेच सदस्यांनी सहकार्य केले.न्हावा-शेवा पोलीस स्टेशनच्या वतीने सहकार्य करण्यात आले.सर्व पात्र नागरिकानी मतदान केले पाहिजे आशा आशयाच्या घोषणा देण्यात आल्या.महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर सेवक व विद्यार्थ्यांच्या सहभागामुळे रॅलीचे आयोजन यशस्वी पार पडले.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
सोमवार २८ ऑक्टोबर २०२४
https://lokaarambh.com


# माधव तात्या निर्मळ यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन



माजलगाव दि.२७ (बातमीदार): माजलगाव मतदार संघाचे अपक्ष उमेदवार माधव निर्मळ यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन हभप गडदे महाराजांचे हस्ते संपन्न झाले. शहरा लगत असल्याने खानापूर येथे माधव निर्मळ यांच्या प्रचार /जनसंपर्क कार्यलयाचे उद्घाटन हभप शिवाजी महाराज यांच्या शुभ हस्ते संपन्न झाले. यावेळी गडदे महाराज म्हणाले की, माधव निर्मळ हे प्रसिद्ध उद्योजक, सामाजिक कार्य करणारे, असे व्यक्तिमत्व आहे. माधव निर्मळ अपक्ष उमेदवार जरी असले तरी त्यांच्या पाठीशी जनशक्ती आहे. सर्वांच्या आग्रहाखातर ते ही निवडणूक लढवत आहेत. अतिशय शांत संयमी उद्योगशील व्यक्तिमत्व म्हणून त्यांची सर्वत्र ओळख आहे. त्यांच्या घरातूनच त्यांना सामाजिक वारसा मिळाला आहे व अनेक वर्षापासून सामाजिक कार्यातून व औद्योगिक क्षेत्रातून त्यांनी अनेकांना सहकार्य केले आहे. येणाऱ्या काळात देखील निर्मळ हे आमदार झाल्यानंतर हजारो तरुणांना उद्योगाच्या माध्यमातून काम देतील. त्यांच्या पाठीशी सर्व मतदार खंबीरपणे उभे राहुन मतदान रूपी आशीर्वाद देतील. नुकत्याच लोकसभा निवडणुकीच्या वेळेस त्यांनी पंकजा मुंडे यांचे अहोरात्र काम केले होते. त्यामुळे खरे तर त्यांना उमेदवारी मिळेल असे वाटत होते, परंतु उमेदवारी न मिळाल्यामुळे ते अपक्ष निवडणुक लढवणार आहेत. माधव निर्मळ यांनी लोकसभेला केलेल्या कामामुळे व मुंडे परिवाराशी असलेल्या घनिष्ठ संबंधामुळे त्यांना निश्चितच त्याचा फायदा होईल यात शंका नाही. माधव निर्मळ यांचे बंधू म्हणाले अनेक वर्षापासून आमच्या परिवाराने उद्योगाच्या माध्यमातून अनेकांना सहकार्य केले आहे. त्यामुळे आम्हाला सामाजिक वारसा असल्यामुळे येणाऱ्या काळात आम्हाला निश्चितच जनतेची सेवा करण्याची सेवा मिळेल यात शंका नाही. जनतेच्या आग्रहास्तव आम्ही अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढवणार आहोत व त्यामुळे जनतारुपी आशीर्वाद आम्हास मिळतील यात शंका नाही, तसेच आम्ही एकदा जनतेला दिलेला शब्द कधीच मागे घेत नाहीत. त्यामुळे आम्ही सर्वांनी मिळून जनतेच्या आग्रहास्तव घेतलेली उमेदवारी ही कदापिही मागे घेणार नाहीत. त्यावेळी कल्याण आबुज यांनी प्रस्तावित केले. रणजीत रूपनर यांनी आभार प्रदर्शन मानले. या प्रसंगी सर्वजातीधर्माचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते

## तानाजी मुटकुळे यांना भवणार जरांगे फॅक्टर



हिंगोली:-(प्रतिनिधी) या विधानसभेमध्ये भारतीय जनता पार्टी कडून तानाजी मुटकुळे यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली असली तरी यापूर्वी त्यांनी जरांगे आणि मराठा आरक्षणाच्या बाबतीत केलेले विधान त्यांना भवणार असण्याची शक्यता निर्माण झालेली आहे. तानाजी मुटकुळे हे भारतीय जनता पार्टी कडून सलग दोन वेळा आमदार राहिलेले आहेत परंतु मराठा आरक्षणाच्या संदर्भात जेव्हा वातावरण पेटलेले होते. त्यावेळी त्यांनी जरांगे यांच्या विरोधात विधान केले एवढेच नव्हे तर मराठा समाजाला जर आरक्षण मिळाले नाही तर मी हिंगोली विधानसभा निवडणूक लढविणार नाही. असे देखील त्यांनी जाहीर केले होते . यासंदर्भातले व्हिडिओ सोशल माध्यमांवर व्हायरल झालेले आहेत. या परिस्थितीत संतापलेला मराठा तानाजी मुटकुळे यांच्या विरोधात पेटला आहे. त्यातल्या त्यात अपक्ष म्हणून मैदानात उतरलेले भाऊराव पाटील गोरेगावकर हे दि. 26 ऑक्टोबर शनिवारी रात्री जरांगे यांची भेट घेऊन आले आहेत. त्यामुळे या विधानसभेत मुटकुळे यांचा जरांगे फॅक्टर मुळे मोठा त्रास वाढला आहे. ही परिस्थिती पाहता आजच्या घडीला मुटकुळे यांचा पाय खोलात असल्याचे दिसून येत आहे. जरांगे यांच्याकडून अद्यापही हिंगोली विधानसभेत कोणताही उमेदवार जाहीर करण्यात आलेला नाही. परंतु जो उमेदवार जाहीर होईल किंवा न होईल त्यावरची देखील परिस्थिती मुटकुळे यांच्या विरोधातच असणार आहे . जरांगे यांच्या विरोधातील व्हिडिओमुळे आजच्या घडीला मुटकुळे प्रचंड अडचणीत आल्याचे दिसून येत आहे.

## मा बाबरी ( शेठ ) मुंडे म्हणजे विकासाची जान असनारा नेता - युवा नेते - बालासाहेब तिडके



भोगलवाडी ( बाबुराव तिडके ) सामाण्य माणसाच्या मनावर अधिराज्य गाजवणारे म्हणुन माजलगाव मतदार संघामध्ये त्यांची ओळख आहे ज्याचे नाही कोणी त्याचे आहेत बाबरी ( शेठ ) मुंडेजी रंजल्या गांजल्या गरीब जनतेचे कै वारी म्हणुन देखिल् त्यांच्याकडे पाहीले जाते माजलगाव मतदार संघामध्ये जनता त्यांच्याकडे भावी आमदार म्हणुन पाहाते गेल्या चाळीस वर्षापासुन मा राजेभाऊ ( अण्णा ) मुंडे यांचे घराणे आ पंकजाताई मुंडे यांच्या घराण्याशी एकनिष्ठ आहे माजलगाव विधानसभा लढण्यासाठी आ ताईसाहेब यांची राजकिय ताकत मा बाबरी मुंडे यांच्या पाठीमागेच राहाणार असल्याने त्यांची आमदारकी कोणीच रोखु शकत नाही कारण विकास काय असतो तो कसा करूण दाखवायचा असतो याचा जबरदस्त अनुभव मा बाबरी शेठ यांना असल्यामुळे शेठजी आमदार झाल्यानंतर माजलगाव विधानसभेतील भागाचे विकास रूपी रुपडे बदलुन नक्कीच या भागाचे नंदनवन करतील व विकासा पासुन कोसो दर् असलेला माजलगाव मतदार संघ विकसनशील बणवतील असे मा बाबरी ( शेठ ) मुंडे यांचे अत्यंत विश्वासु युवा नेते श्री बालासाहेब तिडके बोलत होत

## मा.आ.प्रा.संगीताताई ठोंबरे या आज सोमवारी उमेदवारी अर्ज दाखल करणार



केज विधानसभा मतदारसंघाच्या माजी आमदार प्रा. संगीताताई डॉ. विजयप्रकाश ठोंबरे या दिनांक २८ ऑक्टोबर रोजी केज विधानसभा राखीव मतदार संघातून नामनिर्देशन पत्र सादर करण–र आहेत. त्या निमित्त केज शहरातून त्या शक्ती प्रदर्शन करणार आहेत. धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज चौक धारूर रोड येथून छत्रपती संभाजी महाराज चौकात पुष्पहार अर्पण केल्या नंतर प्रचंड रॅली निघणार आहे. भारत रत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, सावता माळी चौक, भगवान बाबा चौक, मौलाना आझाद चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे पुष्पहार अर्पण करून महापुरुषांना अभिवादन करून त्यांच्या आणि मतदार संघातील जनतेच्या आशीर्वादाने मा. आ. प्रा. संगीताताइ डॉ. विजयप्रकाश ठोंबरे या आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. उमेदवारी अर्ज दाखल केल्या नंतर त्या मतदार संघातील जनतेशी व प्रसार माध्यमांशी आपली भूमिका आणि निवडणुकी संदर्भात भूमिका मांडणार आहेत. त्या निमित्त सर्व कार्यकर्त्यांनी उमेदवारी अर्ज भरण्यासाठी केज येथे उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आलेले आहे

## कुणाल पाटील युवा सामाजिक संस्थेतर्फे दिवाळी फराळ वाटप



उरण दि २७(विठ्ठल ममताबादे ) कुणाल पाटील युवा सामाजिक संस्था ही उरण तालुक्यातील नामांकित व अग्रेसर सामाजिक संस्था असून या संस्थेच्या माध्यमातून दरवर्षी विविध उपक्रम राबवले जातात. सामाजिक बांधिलकी जपत कुणाल पाटील युवा सामाजिक संस्थेच्या माध्यमातून स्वामी ब्रह्मानंद प्रतिष्ठान सिबर्ड विशेष मुलांची शाळा बोरी नाका उरण मोरा रोड येथे दिवाळीनिमित्त मुलांना फराळ वाटप तसेच चित्रकलेचे साहित्य वाटप करण्यात आले. त्यानंतर रायगड जिल्हा परिषद शाळा पागोटे, कुंडेगाव, नवघर या शाळेतील सर्व मुलांना दिवाळीच्या फराळाचे वाटप करण्यात आले. फराळ व साहित्य मिळाल्याने विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण होते.यावेळी संस्थेचे संस्थापक कुणाल पाटील, सल्लागार महेश पाटील, अध्यक्ष सुमित पाटील, उपाध्यक्ष नकुल पाटील, सदस्य - प्रणय पाटील,ऋषिकेश म्हात्रे,विनय पाटील, अमित पाटील,हेमंत पाटील,आकाश म्हात्रे,रोशन म्हात्रे,ज्योतेश तांडेल, ऋतिक पाटील, साईराज पाटील,रितेश पाटील,अभिषेक केशवे,सेतराज साकेत, ऋषिकेश पाटील आदी पदाधिकारी सदस्य उपस्थित होते.फराळ वाटप साहित्य वाटपाचा कार्यक्रम अत्यंत उत्साहात संपन्न झाला. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कुणाल पाटील युवा सामाजिक संस्थेच्या सर्वच पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विशेष मेहनत घेतली.

# केज विधानसभेचे महाविकास आघाडीचे उमेदवार माजी आमदार पृथ्वीराज साठे नशिबवान !

## पवार निष्ठेचे साठे यांना फळ मिळण्याची शक्यता; केजची तटबंदी केली मजबूत



अंबाजोगाई : प्रतिनिधी केज विधानसभा मतदारसंघातून महाविकास आघाडीची उमेदवारी कोणाला मिळेल ? असा संभ्रम केज विधानसभा मतदारसंघातील मतदारांत निर्माण झाला होता मात्र राजकारणात निष्ठेला नक्की फळ मिळते असे अनेक वेळा म्हटले जाते पवारावरील निष्ठेचे फळ माजी आमदार पृथ्वीराज साठेंना मिळाले असून महाविकास आघाडीचे साठे उमेदवार बनल्याने ते नशीबवान ठरले विशेष म्हणजे केज मतदार संघाची पवारांनी मजबूत तटबंदी केल्याने साठे समर्थकांच्या आशा आता पल्लवीत झाल्याचे दिसत आहे बीड जिल्ह्यात महाविकास आघाडीतील शरद पवार गटाने आष्टी मतदार संघातून राष्ट्रवादी युवाचे प्रदेशाध्यक्ष मेहबूब शेख यांना आघाडीची उमेदवारी देऊन शरद पवारांनी बीड जिल्ह्यातील मुस्लिम समाजाला न्याय दिल्याची भावना मुस्लिम समाजात निर्माण झाली आहे भाजपाचे आमदार सुरेश धस यांनीही शरद पवारांची भेट घेतल्याचे समजते गेवराई मतदार संघात शिवसेना ठाकरे गटाचे बदामराव पंडित यांना उमेदवारी मिळाली राष्ट्रवादी अजित पवार गटाची उमेदवारी अमरसिंह पंडित यांना मिळू शकते बीडमध्ये शरद पवार गटांची उमेदवारी कोणाला ? हे निश्चित झाल्यानंतर अजित पवार गटाची उमेदवारी जाहीर होऊ शकते असाही अंदाज बांधला जात आहे बीडमध्ये मुस्लिम समाजाला अजित पवार गट उमेदवारी देण्याची शक्यता वर्तवली जात आहे भाजपाला बीड जिल्ह्यात केवळ केजच्या एका जागेवर समाधानमानावे लागले आहे बीड जिल्ह्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा ,राज्याचे मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री सह भाजपाच्या स्टार प्रचारकांच्या सभा केज विधानसभा मतदारसंघात सर्वात जास्त होण्याची शक्यता वर्तवली जात आहे माजी आमदार पृथ्वीराज साठे नशिबवानच ! केज विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार पृथ्वीराज साठे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष फुटी नंतर साठेंनी शरद पवार गटात राहणे पसंत केले साठेची ही निष्ठेची भूमिका शरद पवार तसेच खासदार सुप्रिया सुळे यांना भावल्याचे समजते त्यामुळे पहिल्या दिवसापासून पवारांच्या मनात माजी आमदार पृथ्वीराज साठे हेच होते साठे यांची उमेदवारी अंतिम झाल्याचा पहिला फोन बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांनी साठे यांना सांगितले दुसरी महत्त्वाची घडामोड झाली ती बीडच्या ज्योतीताई मेटे यांचा शरद पवार गटात प्रवेश झाला आहे माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचाही प्रवेश होण्याची शक्यता वर्तवली जात आहे दुधात साखर म्हणी प्रमाणे माजलगाव मतदार संघातील इच्छुक उमेदवार भाजपाचे रमेश आडसकर यांनी काल शरद पवार गटात जाहीर प्रवेश केला त्यांना माजलगाव मतदार संघातून उमेदवारी मिळण्याची शक्यता वर्तवली जाते साठे यांना केज मतदार संघात आडसकर गटाची मोलाची मदत निवडणुकीत मदत होईल असा अंदाज व्यक्त केला जात आहे तिसरा फॅक्टर अंबाजोगाई शहराचा माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी अजित पवार गटात असले तरी त्यांनीही माजी आमदार साठे यांचा उघड प्रचार करण्याचा मानस बोलून दाखवला असल्याचे समजते परळी विधानसभा मतदारसंघातील इच्छुक उमेदवार माजी आमदार संजय भाऊ दौंड यांनी काल आपली भूमिका जाहीर केली त्यांचाही केज मतदार संघात माजी आमदार साठे यांना बऱ्यापैकी राजकीय फायदा होऊ शकतो या सर्व माजी आमदार तथा महाविकास आघाडीचे उमेदवार पृथ्वीराज साठे यांना राजकीय फायदा होण्याची शक्यता वर्तवली जात आहे साठे यांना पवारांनी फक्त उमेदवारीचे तिकीट दिले नाही तर केज विधानसभा मतदारसंघांमध्ये सर्व बाजूने मदत होऊ शकेल अशी तटबंदी मजबूत केल्याची चर्चा होत आहे आता पाहू प्रत्यक्षात याचा किती फायदा मिळू शकता

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

सोमवार २८ ऑक्टोबर २०२४



या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

# पवारांकडून परळीत राजेसाहेब देशमुख, माजलगावात मोहनराव जगताप उमेदवार

## परळीत शरद पवारांच्या फोटोला फासली शाई! नाराज कार्यकर्त्यांनी बॅनरही फाडले





परळी दि.२७ (बातमीदार): राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडून आज उमेदवारांची तिसरी यादी जाहीर करण्यात आली आहे. या यादीत माजलगाव तथा परळीच्या उमेदवाराची देखील घोषणा करण्यात आली आहे. परळीतून काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख यांना राष्ट्रवादीत घेऊन तर माजलगाव मधून मोहनराव जगताप यांना उमेदवारी देण्यात आली आहे. त्यामुळे धनंजय मुंडेविरोधात आता राजेसाहेब देशमुख रिंगणात असणार हे स्पष्ट झाले आहे. दरम्यान राजेसाहेब यांची उमेदवारी जाहीर होताच पक्षातील इच्छुक आणि संभाव्य उमेदवारांमध्ये प्रचंड नाराजी असल्याचे चित्र आहे. इच्छुक उमेदवार राजेभाऊ फड यांना उमेदवारी न मिळाल्याने त्यांचे कार्यकर्ते आक्रमक झाले आहेत. राजाभाऊ फड यांच्या कार्यालयाबाहेर लावण्यात आलेले शरद पवार यांचे आणि पक्षाचे बॅनर संतप्त कार्यकर्त्यांनी फाडून टाकले आहेत. तसेच शरद पवारांच्या बॅनरवरील फोटोला फड यांच्या संतप्त कार्यकर्त्यांनी शाई फासली आहे. परळी विधानसभा मतदारसंघातून राजेभाऊ फड हे इच्छुक आणि संभाव्य उमेदवार होते. त्यामुळे त्यांनी तशी तयारी देखील केली होती. मागील पंधरा दिवसांपासून ते शरद पवारांच्या भेटी घेत होते. त्यांची पवारांसोबत बैठक देखील झाल्याची माहिती समोर आली आहे. मात्र आज शरद पवारांनी धनंजय मुंडे यांच्या विरोधात राजेसाहेब देशमुख हे मराठा कार्ड खेळल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. राजेसाहेब यांना उमेदवारी मिळाल्यानंतर राजेभाऊ फड याच्या कार्यकर्त्यांमध्ये नाराजी आहे. फड यांनी उमेदवारी मिळाली नाही तर दुसऱ्या उमेदवाराचा प्रचार करेल असेही सांगितले होते. मात्र पक्षाने फड यांना उमेदवारी न दिल्याने त्यांचे कार्यकर्ते मात्र चांगलेच आक्रमक झाले आहेत. त्यामुळे आता परळी मतदारसंघात मराठा विरुद्ध ओबीसी हा संघर्ष अटळ आहे असे मानले जात आहे. जरांगे फॅक्टरचा प्रभाव असलेल्या परळी मतदारसंघात शरद पवारांनी मराठा उमेदवार राजेसाहेब देशमुख यांना उमेदवारी दिली आहे. त्यामुळे परळी विधानसभा निवडणुकीत ओबीसी विरुद्ध मराठा संघर्ष पाहायला मिळण्याची शक्यता आहे. राजेसाहेब देशमुख गेल्या महिन्यातच काँग्रेसमधून शरद पवारांच्या संपर्कात होते. तसेच त्यांनी मनोज जरांगे पाटील यांची देखील भेट घेतली होती. मराठा आरक्षण आंदोलनामुळेच लोकसभा निवडणुकीत भाजप नेत्या पंकजा मुंडे यांचा पराभव झाला अशी बीडमध्ये चर्चा आहे. आता विधानसभा निवडणुकीतही परळीत धनंजय मुंडेंसाठी ही निवडणूक आव्हानात्मक ठरू शकते असे मानले जात आह

## विधानसभेसाठी काँग्रेसची चौथी यादी जाहीर, पाहा कोणाला कुठून संधी?

काँग्रेसनं आपल्या उमेदवारांची चौथी यादी जाहीर केली आहे. चौथ्या यादीमध्ये काँग्रेसनं एकूण 14 उमेदवारांची घोषणा केली आहे. यापूर्वी काँग्रेसनं उमेदवारांच्या तीन याद्या जाहीर केल्या होत्या. तर आता काँग्रेसकडून उमेदवारांची चौथी यादी जाहीर करण्यात आली आहे, चौथ्या यादीमध्ये एकूण 14 उमेदवारांची घोषणा करण्यात आली आहे.

काँग्रेसच्या चौथ्या यादीमध्ये एकूण 14 उमेदवारांच्या नावाची घोषणा करण्यात आली असून, यामध्ये भगिरथ भालके यांना पंढरपूरमधून उमेदवारी देण्यात आली आहे. अमळनेरमध्ये अनिल शिंदे, उमरेडमध्ये संजय मेश्राम, आरमोरीमधून रामदास मसराम यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

काँग्रेस उमेदवारांची चौथी यादी

अमळनेर -अनिल शिंदे
उमरेड – संजय मेश्राम
अरमोरी- रामदास मसराम
चंद्रपूर- प्रवीण पडवेकर
बल्लारपूर – संतोषसिंग रावत
वरोरा -प्रवीण सुरेश काकडे
नांदेड उत्तर – अब्दुल सत्तार
औरंगाबाद पूर्व – लहू शेवाळे
नालासोपारा – संदीप पांडे
अंधेरी पश्चिम – अशोक जाधव
पंढरपूर – भगिरथ भालके
सोलापूर दक्षिण- दिलीप माने
शिवाजीनगर – दत्तात्रय बहिरट
पुणे कॅंटोन्मेट – रमेश बागवे



दरम्यान आतापर्यंत काँग्रेसकडून एकूण चार उमेदवारांच्या याद्या जाहीर करण्यात आल्या आहेत. काँग्रेसनं आपल्या पहिल्या यादीमध्ये एकूण 48 उमेदवारांची घोषणा केली होती. दुसऱ्या यादीमध्ये 23 तर तीसऱ्या यादीमध्ये 16 उमेदवारांची घोषणा केली. आता चौथ्या यादीमध्ये काँग्रेसकडून एकूण 14 उमेदवारांची घोषणा करण्यात आली आहे. महाविकास आघाडीध्ये सध्या काँग्रेसनं आघाडी घेतली असून, आतापर्यंत काँग्रेसकडून सर्वाधिक विधानसभेच्या जागांवर उमेदवारांची घोषणा करण्यात आली आहे. शिवसेना ठाकरे गटाकडून आतापर्यंत तीन उमेदवारांच्या याद्या जाहीर करण्यात आल्या आहेत. ज्यामध्ये पहिल्या यादीमध्ये 65 दुसऱ्या यादीमध्ये 15 तर तिसऱ्या यादीमध्ये चार उमेदवारांची घोषणा करण्यात आली आहे. तर राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून देखील विधानसभेसाठी उमेदवारांच्या तीन याद्या जाहीर करण्यात आल्या आहेत, पहिल्या यादीमध्ये 45, दुसऱ्या यादीमध्ये 22 आणि तिसऱ्या यादीमध्ये 9 उमेदवारांची घोषणा करण्यात आली आहे.

## मनसेकडून वधिानसभा नविडणुकीसाठी उमेदवारांची सहावी यादी जाहीर, कुणाकुणाला संधी?



महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारांची सहावी यादी जाहीर करण्यात आली आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी स्वत: ट्विट करत याबाबत माहिती दिली आहे. मनसेकडून जाहीर करण्यात आलेल्या सहाव्या यादीत एकूण 32 उमेदवारांची घोषणा करण्यात आली आहे. या यादीत नाशिक पूर्वमधून प्रसाद सानप यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. तसेच देवळाली मतदारसंघातून मोहिनी जाधव, नाशिक मध्यमधून अंकुश पवार, जळगाव ग्रामीणमधून मुकुंदा रोटे, विलेपार्ले मतदारसंघातून जुईली शेंडे यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. तसेच कल्याण पश्चिममधून उल्हास भोईर, उल्हासनगरमधून भगवान भालेराव यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.राज ठाकरे यांनी डोंबिवलीत कार्यक्रमात आमदार राजू पाटील आणि अविनाश जाधव यांना उमेदवारी जाहीर केली होती. त्यानंतर दुसऱ्या दिवशी रात्री उमेदवारांची दुसरी यादी जाहीर करण्यात आली होती. या यादीत राजू पाटील आणि अविनाश जाधव यांचंदेखील नाव होतं. या यादीत एकूण 45 उमेदवारांची नावे होती, त्यानंतर तिसऱ्या यादीत 13, चौथ्या यादीत 5, पाचव्या यादीत 15, सहाव्या यादीत 32 असे एकूण आतापर्यंत 110 उमेदवारांची नावे जाहीर करण्यात आली आहेत.

# माजलगाव विधानसभा निवडणूक अपक्ष लढवणार – प्रा.ईश्वर मुंडे

मुंबई/ धारूर/वडवणी (प्रतिनिधी) देशाचे नेते पद्म विभुषण खा.शरदचंद्र पवार साहेब व प्रदेशाध्यक्ष आ.जयंत पाटील साहेब यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून बीड जिल्हा परिषद अंतर्गत शिक्षण विस्तार अधिकारी पदावरून स्वेच्छा सेवा निवृत्ती घेऊन राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षात धारूर तालुकाक्षध्य,ओबीसी सेल प्रदेश सरचिटणीस,सेवा निवृत्त अधिकारी सेल राज्य प्रमुख या पदावर पक्षाचे सक्रीय काम करून खा.शरदचंद्र पवार साहेबांचे व पक्षाचे विचार वाडी,वस्ती, तांड्यापर्यंत पोहचवले.सन.२०१९ ला माजलगाव मतदार संघाचा आमदार निवडून आनला.पक्ष फुटल्यानंतर ही निष्ठेने खा.शरदचंद्र पवार साहेबांच्या पक्षातच राहीलो.८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण करून जन सामान्यांच्या मनात घर केलेले आहे.

मागे सन २०२१ ला छत्रपती संभाजी नगर पदवीधर मतदार संघात उमेदवारी मागणी केलेली होती,२०२४ ला बीड लोकसभा मतदार संघात जनसंपर्क वाढवून बीड लोकसभेच्या उमेदवारीची मागणी केलेली होती. वरील दोन्ही वेळी मला पक्षाने आपला नंतर विचार करू असे सांगून थांबवले.



आता सन २०२४ च्या माजलगाव विधानसभा निवडणूकीसाठी पक्षाकडे रितसर उमेदवारीची मागणी करून माजलगाव मतदार संघातील शंभर गावात जन संवाद दौरा करून पक्षाचे कार्य वाढवलेले आहे. माझ्या परिचय पत्राच्या पन्नास हजार प्रति मतदार संघातील सर्व गावांमध्ये वाटप केलेल्या आहेत.

या वेळी माजलगाव मतदार संघात माझ्या विषयी मतदारांमध्ये सहानुभूती असून पक्षाने आपणास संधी द्यावी अशी जन भावना होती. या मुळे मी निश्चित निवडणूक जिंकू शकत होतो.परंतू असे न होता मला पक्षाने निवडणूक लढण्याची संधी व तिकीट दिले नाही.

या मुळे मतदार संघातील जनता नाराज झालेली असून तुम्ही अपक्ष निवडणूक लढवावी आम्ही तुमच्या पाठीशी आहेत हा दबाव माझ्यावर वाढत असल्यामुळे मी माजलगाव विधानसभा मतदार संघ निवडणूक - २०२४ जनतेच्या विश्वासावर अपक्ष लढवणार असून सोमवार दि.२८ ऑक्टोबर २०२४ रोजी दुपारी १ वाजता माझा उमेदवारी अर्ज दाखल करणार आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com